MHJG190008252022

**फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक २०५/२०२२ मधील निशाणी १ वरील आदेश.**
**CNR NO.MHJG190008252022**

१. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार गजानन मधुकर पांडे, रा. एरंडा, ता. बारशी टाकळी, जि. अकोला यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४५७ प्रमाणे पारोळा पोलिस ठाणे येथील गु.र.नं. ३९४/२०२२ गुन्हा कलम भा.द.वि. कलम २७९, ३३७, ३३८ व मोटर वाहन अधिनियमाचे कलम १८४ व १३४ (ब) प्रमाणे जप्ती केलेली फोर्स मोटर्स लि. कंपनीची क्रुझर मॉडेल असलेली चारचाकी प्रवासी वाहन त्याचा क्र. MH 28 C 4532, चेसीस क्र. T57046715L06 व इंजीन क्र. D270145104 हे वाहन परत मिळविण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जावर तपासी अधिकारी व सरकारी वकील यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रस्तुतच्या अर्जामध्ये अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, पारोळा पोलिस ठाणे येथील गु.र.नं. ३९४/२०२२ गुन्हा कलम भा.द.वि. कलम २७९, ३३७, ३३८ व मोटर वाहन अधिनियमाचे कलम १८४ व १३४ (ब) प्रमाणे जप्ती केलेली फोर्स मोटर्स लि. कंपनीची क्रुझर मॉडेल असलेली चारचाकी प्रवासी वाहन त्याचा क्र. MH 28 C 4532, चेसीस क्र. T57046715L06 व इंजीन क्र. D270145104 हे वाहन अर्जदार यांच्या मालकीचे असुन

सदरील जप्त वाहन हे पोलिस ठाण्यामध्ये पडुन राहिल्यास त्याचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे सदरील जप्त वाहन हे त्यांना परत करावे अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे. तसेच अर्जदार यांनी सदरील जप्त वाहन परत करण्यासाठी ज्या काही अटी व शर्ती घातल्या जातील त्याचे पालन करण्यास तयार असल्याचे नमुद केले आहे.

३. सरकारी वकील व तपासी अधिकारी यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये जप्त वाहन हे अर्जदार यांना योग्य त्या अटी व शर्तीवर परत करण्यास त्यांची काही हरकत नसल्याचे नमुद केले आहे.

४. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठर्थ त्यांचे शपथपत्र, प्रथम खबर अहवालाची छायांकित प्रत, जप्त वाहनाची आर सी बुकची प्रमाणीत प्रत, जप्त वाहनाची विम्याची छायांकित प्रत, जप्त वाहनाची फॉर्म नं. २५ ची छायांकित प्रत व अर्जदार यांचे आधार कार्डची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. सदरील अर्जदार यांच्या मार्फत दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता अर्जदार हे जप्त वाहनाचे मालक असल्याचे दिसून येते. तसेच तपासी अधिकारी व सरकारी वकील यांनी सदरील जप्त वाहन हे योग्य त्या अटी व शर्तीवर अर्जदार यांना परत करण्यास त्यांची हरकत नसल्याचे त्यांच्या म्हणण्यामध्ये नमुद केलेले आहे. तसेच सदरील जप्त वाहन पोलिसांच्या ताब्यात ठेऊन काहीही साध्य होणार नाही व जप्त वाहनाचे नुकसान होण्याची शक्यता आहे. तसेच सदरील जप्त वाहन अर्जदार यांना परत न केल्यास अर्जदार यांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे अर्जदार हे सदरील जप्त वाहन हे योग्य त्या अटी व शर्तीवर परत मिळविण्यास पात्र आहेत. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब हे न्यायालय खालील आदेश पारीत करीत आहे–

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात आला.

२. पोलिस निरीक्षक, पारोळा पोलिस ठाणे यांना असे आदेशीत केले जाते की, त्यांनी पारोळा पोलिस ठाणे येथील गु.र.नं. ३९४/२०२२ गुन्हा कलम भा.द.वि. कलम २७९, ३३७, ३३८ व मोटर वाहन अधिनियमाचे कलम १८४ व १३४ (ब) प्रमाणे जप्ती केलेली फोर्स मोटर्स लि. कंपनीची क्रुझर मॉडेल असलेली चारचाकी प्रवासी वाहन त्याचा क्र. MH 28 C 4532, चेसीस क्र. T57046715L06 व इंजीन क्र. D270145104 हे वाहन अर्जदार यांना परत करावे.

३. अर्जदाराने खटल्याचा निकाल लागेपर्यंत जप्त सदरील वाहनच्या स्वरुपात कसलाही बदल करु नये, त्याची विक्री, हस्तांतरण किंवा इतर कसल्याही प्रकारे तब्दीली करु नये व न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे गरज भासेल तेव्हा ती अर्जदार याने हजर करावी व त्या बाबतचा रक्कम रुपये रक्कम रु. १,००,०००/– (रक्कम रुपये एक लाख मात्र) चा किंमतीचा सुपूर्दनामा न्यायालयात द्यावा.

४. पोलीस निरीक्षक, पारोळा पोलीस ठाणे यांनी जप्त वाहन अर्जदार यांना परत करणेपुर्वी त्याचे फोटो अर्जदार यांचे खर्चाने काढुन ते अभिलेखावर ठेवावे.

५. प्रस्तुत आदेशाची प्रत पारोळा पोलिस ठाणे येथील गुन्हा रजि.क्र. ३९४/२०२२ मध्ये ठेवण्यात यावी.

( एम. एस. काझी )

दिनांक – १४–११–२०२२. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पारोळा.